## 1) आस्थापना विभाग

या शाखेमार्फत वित्त विभागातील राजपत्रित वर्ग-1 व वर्ग-2 च्या अधिका-यांचे तसेच लेखा संवर्गातील कर्मचा-यांचे आस्थापना विषयक कामकाज केले जाते. लेखा संवर्गातील कर्मचा-यांच्या नेमणुका, पदोन्नत्या, बदल्या, जेष्ठता याद्या, सेवानिवृत्ती प्रकरणे, गोपनिय अहवाल तसेच लेखा संवर्गातील कर्मचा-यांचे सेवा-अंतर्गत परिक्षेचे कामकाज करणे, लेखा संवर्गातील कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी परतावा/नापरतावा अग्रिमास मंजुरी देणे, गट विमा प्रस्तावास मंजूरी देणे, 54 वर्षे पूर्ण झालेल्या लेखासवंर्गातील कर्मचा-यांचे पूनर्विलोकन करणे, वैद्यकिय प्रतिपुर्ती प्रस्ताव तपासणी करुन मान्यतेस्तव सादर करणे.

महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील अधिका-यांचे / लेखा संवर्गातील् कर्मचा-यांचे मासिक वेतन व भत्ते मंजूरी देणे, अधिकारी/कर्मचा-यांचे मुळ व दुयम सेवापुस्तिका अद्ययावत ठेवणे, प्रलंबीत प्रकरणे विहीत मुदतीत निपटारा करणेविषयी कार्यवाही करणे. वरिष्ठांच्या आदेशानुसार आस्थापना शाखेचे कामकाज करणे.